## सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांचे नोंदणीकरण.

**या संबंधातील कार्यवाही खालील याशासननिर्णया अन्वये करण्यात येते.**

१.शासननिर्णय क्र.ग्रासयो-२००७/प्रक्र.१/यो-९,दिनांक २० एप्रिल,२००७.

२. शासननिर्णय क्र.ग्रासयो-२००७/प्रक्र.१/यो-९,दिनांक ८मे,२००७.

३. शासननिर्णय क्र.ग्रासयो-२००७/प्रक्र.१/यो-९,दिनांक १७डिसेंबर ,२००८.

४. शासननिर्णय क्र.ग्रासयो-२०१५/प्रक्र.१/यो-९,दिनांक १० मार्च,२०१५.

५.शासननिर्णय संकीर्ण क्र.ग्रासयो-२०१७/प्रक्र.३५/यो-९,दिनांक ३१ मार्च,२०१७.

**१.सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना पंजिकरणाकरिता खालील दस्तऐवज सादर करणे आवश्यक/अनिवार्य आहे.**

अ) विहीत केलेला अर्जाचा नमुना (Appendix-C)

ब) स्थापत्य अभियांत्रीकी पदवी/पदविका,AMIE तसेच Institution of civil engineers (INDIA),LUDHIANA(PUNJAB)

तर्फे स्थापत्य पदविक प्राप्त केलेल्या अभियंत्यांना परिक्षा उत्तिर्ण केल्याचे प्रमाणपत्र.

क) अधिवास प्रमाणपत्र

ड) नोंदणी प्रस्ताव दाखल केल्यानंतर ५० % नोंदणी शुल्काची रक्कम ,व नोंदणी प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर उर्वरीत ५०% नोंदणी

शुल्काची रक्कम जमा करणे आवश्यक आहे.

इ) पासपोर्ट साईज फोटो.

फ) इतर दस्तऐवज

१) अंतिम वर्षची गुणपत्रिका

२) महाविद्यालय सोडल्याचा दाखला (T.C)

३) Employment नोंदणी प्रमाणपत्र

४) पॅन कार्ड

५) शपथ पत्र - उच्च यिक्षण घेत नसल्याचे व शासकीय/निमशासकीय नोकरी करित नसल्याबाबतचे.

२. सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना सवलती

१. अ) बयाना रक्कम देण्या संबंधी सुट. ब) अनामत रक्कम भरणेसंबंधी ५० % सुट

सदरील सवलत ही जी कामे स्पर्धात्मक निविदा न मागविता सुशािक्षित बेरोजगार अभियंता यांना देण्यात येतिल,त्या बाबत

वरील सवलत लागु राहील.

२ . परंतु जी कामे जाहीर निविदेद्वारे मागविण्यात येतिल व ज्या सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांनी स्वतंत्र कंत्राटदारा प्रमाणे स्वतंत्र

निविदा भरलेल्या असतील तेव्हा बयाना रक्कम व अनामत रककम भरण्यासाठी सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना ईतर

कंत्राटदाराप्रमाणेच मानण्यात येईल.

**३. सुशािक्षित बेरोजगार अभियंता यांना निविदा मर्यादा**

ज्या नोंदणीकृ त सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांनी रु.५.०० लक्ष पर्यंतचे पहीले काम यशस्विरित्या पुर्ण केलेले आहे असेच सुयिक्षित बेरोगार अभियंता विनास्पर्धा रु.१५.०० लक्षर पर्यंतची कामे देण्यासाठी पात्र राहतील. अशा विनास्पर्धा देण्यात येणा-या कामांची एकत्रीत रक्कम रु.६०.०० लक्ष प्रति वर्ष ईतकी राहील.

४. शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णया अन्वये उपरोक्त नमूद बाबाीमध्ये आदेशानुसार बदल केलेले लागू असतील.

**कार्यकारी अभियंता ,**
**जि.प.बांधकाम विभाग क्र.१,यवतमाळ**